



# प्रीतिसंगम

www.pritisangam.com

सातारा-सांगली-कोल्हापूर-पुणे-सोलापूर





वर्ष २९ वे | अंक १०८ | पाने ४ | रविवार | दि. १७ ऑगस्ट २०२५ | किंमत २ रूपये | R.N.I.No.MAHMAR./2001/10338 पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 | फोन-२२७७२५

# बोलतो तेच मी करून दाखवतो

## उपमुख्यमंत्री अजित पवार ;सांगलीच्या मेळाव्यास उस्फुर्त प्रतिसाद

**सांगली/प्रतिनिधी:-**

मी फटकळ आहे असा आरोप वारंवार माझ्यावर विरोधक करत असतात. वास्तविक मी कडक बोलतो, मात्र सत्य बोलतो. जे बोलतो ते करून दाखवतो. तोंडात एक आणि पोटात एक असा माझा स्वभाव नाही. बोलतो तीच माझी भूमिका असते राष्ट्रवादी हा शब्द देणारा व तो पाळणारा पक्ष आहे असे प्रतिपादन उपस्थित मुख्यमंत्री अजित पवार यांनी केले. अजित पवार शनिवारी सांगली दौ-यावर होते. यावेळी विजयनगर येथे आयोजित केलेल्या मेळाव्यात ते बोलत होते. ओबीसी आरक्षणावरून

राज्यातील अनेक निवडणुका थांबल्या होत्या. मात्र, सुप्रीम कोर्टाच्या निकालामुळे तो मार्ग मोकळा झाला असून लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लागणार आहेत. त्यामुळे कार्यकर्त्यांनी कामातून पक्षाची कामे जनसामान्यापर्यंत पोहोचवावीत. कार्यकर्त्यांनी बेरजेचे राजकारण करावे. वजाबाकीने कोणाचे भले झाले नाही. ओटात एक आणि पोटात दुसरे असे मी करत नाही. बोलतो तेच मी करून दाखवतो असे उपमुख्यमंत्री पवार म्हणाले.

लवकरच सांगली मिरज कुपवाड महापालिका तसेच जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका होणार आहेत. हे पाहता आपल्या भागात कोणते प्रश्न आहेत, कोणत्या कामाला किती निधी मिळत आहे, याबाबत कार्यकर्त्यांनी माहिती घ्यावी असे आवाहन त्यांनी केले. नुसते मेळावे घेऊन उपयोग होणार नाही तर कार्यकर्त्यांनी जिल्ह्यातील प्रत्येक वाडीवस्तीवर व भागांमध्ये जाऊन सरकारचे वतीने करण्यात येणारी कामे त्यांच्यापर्यंत पोहोचवण्याचा आवाहन यावेळी त्यांनी केले. आज राज्यातील अनेक विद्यार्थी विद्यार्थिनी उच्चशिक्षित होऊनही नोकरी मिळत नसल्याने बेकार आहेत. काहीजण उद्योगधंदे सुरू करण्याच्या प्रयत्नात आहेत. त्यांना कुशल असे काम देण्याचे काम सरकार करणार आहे. लवकरच राज्यामध्ये आणखी उद्योगधंदे वाढणार असून त्यासाठी कुशल कामगारांची गरज लागणार आहे. हे पाहून महायुती सरकारने कुशल कामगार घडविण्याचे काम हाती घेतले आहे. प्रत्येक जिल्ह्यात सात हजार विद्यार्थ्यांना एक कुशल कामगार घडविण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा कार्यान्वित करणार असल्याचे पवार यांनी स्पष्ट केले.

ओबीसी आरक्षणामुळे महाराष्ट्रासह अनेक राज्यातील निवडणुका लांबणीवर पडल्या होत्या. मात्र सुप्रीम कोर्टाने पूर्वीच्या धर्तीवर



ओबीसींना आरक्षण देऊन तात्काळ निवडणुका घेण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे लवकरच होणाऱ्या निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला आहे. हे पाहता कार्यकर्त्यांना मोठी संधी उपलब्ध झाली आहे. कार्यकर्त्यांनी राज्य शासनाची कामे लोकांच्यापर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे असे आवाहन पवार यांनी यावेळी केले.या राष्ट्रवादी मेळाव्यास राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष निशिकांत दादा पाटील, माजी आमदार राजेंद्र अण्णा देशमुख, माजी मंत्री शिवाजीराव नाईक, माजी आमदार विलासराव जगताप, अजितराव घोरपडे, जतचे तमनगोंडा पाटील, रवी पाटील यांच्यासह हजारो राष्ट्रवादीचे कार्यकर्ते उपस्थित होते.




# मतदानातील घोटाळ्याच्या निषेधार्थ सांगलीत काँग्रेसचा मशाल मोर्चा

**सांगली/प्रतिनिधी:-**

सांगली जिल्हा काँग्रेसच्यावतीने अखिल भारतीय काँग्रेस व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या आदेशा नुसार जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष डॉ. सिकंदर जमादार यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक आयोगाच्या मतदानातील झालेल्या घोटाळ्याच्या विरोधात मशाल मोर्चा काढण्यात आला.

काँग्रेस भवन ते जुना स्टेशन चौकापर्यंत हा मोर्चा काढण्यात आला. मोर्चामध्ये खा. विशाल पाटील, काँग्रेस सेवा दलाचे जिल्हाध्यक्ष अजित ढोले, माजी सभापती राजेश नाईक, माजी नगरसेवक फिरोज पठाण, तौफिक शिकलगार, मिरज तालुका अध्यक्ष अण्णासाहेब कोरे, जिल्हा काँग्रेस सचिव सचिन चव्हाण, प्रदेश संघटक पैगंबर शेख, प्रदेश काँग्रेसचे नंदकुमार शेळके, एस टी इंटक जिल्हाध्यक्ष डी. पी. बनसोडे, जिल्हा काँग्रेस उपाध्यक्ष शिवाजी मोहिते, रवींद्र वळवडे, आशिष कोरी, बाळासाहेब पाटील, वसीम रोहिले, प्रमोद सूर्यवंशी, राजेश जगदाळे,




शशिकांत नागे, बाबगोंडा पाटील, सुनील भिसे, ॲडव्होकेट शहाबाद नायकोडी, शैलेंद्र पिराळे, हनुमंत यादव, मीना शिंदे, शमशाद नायकवडी, कांचन खंदारे, बासित नायकवडी, प्रकाश होवाळे, बी. बी. डावरे, सुरज काकडे, हरिपूरचे नामदेव पठाडे, अर्जुन चव्हाण, विजय दोडमणी, अमर हंबर इत्यादी सहभागी झाले होते.

# महापालिकांची हंडी आम्हीच फोडणार

**मुंबई/प्रतिनिधी:-**

मुंबई महापालिकेसहित सर्व महापालिकांची हंडी आम्हीच फोडणार असा विश्वास राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठाण्यात व्यक्त केला. यापूर्वी विशिष्ट लोकांपर्यंतच लोणी जात होते, मात्र आता हे लोणी तुमच्या सर्वांपर्यंत पोहचणार आहे. असा टोला देखील मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी लगावला. आनंद दिघे आणि बाळासाहेब ठाकरे यांचा विचारांचा वारसा खऱ्या अर्थाने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेच चालवत असल्याचे सांगत त्यांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांच्यावर स्तुतीसुमनेही उधळली.

शिवसेनेचे दिवंगत जिल्हाप्रमुख



आनंद दिघे यांनी सुरु केलेल्या टेंभी नाका दहीहंडी उत्सवात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हजेरी लावली. यावेळी त्यांनी हे विधान केले. आनंद दिघे यांनी सुरु केलेली ही हंडी ऐतिहासिक हंडी आहे. दिघे साहेबांनी जी शिकवण दिली त्याच पद्धतीने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे कारभार करत आहेत. त्यामुळे आनंद दिघे आणि बाळासाहेबांच्या विचारांचा वारसा खऱ्या अर्थाने चालवणारे सच्चे शिवसैनिक हे एकनाथ शिंदेच असल्याचे फडणवीस म्हणाले.

विरोधकांची विकास विरोधी हंडी जनतेने फोडली, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची विरोधकांवर टीका

तीन वर्षापूर्वी आम्ही विकासाचे थर लावले आणि विकासाची हंडी फोडली. विरोधकांनी विकास विरोधी थर लावले मात्र त्यांची ही हंडी महाराष्ट्र मधील जनेतने फोडून टाकली. अशी टीका उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.

ठाण्यातील टेंभी नाक्यावरील दिघे यांच्या मनाच्या हंडीला त्यांनी हजेरी लावली यावेळी त्यांनी विरोधकांचा समाचार घेतला. यापुढेही आपल्याला विकासाचे थर लावायचे असून ठाण्यासह राज्याचा विकास करायचा असल्याचे ते म्हणाले.

विधानसभेची हंडी महायुती फोडणार असे मी म्हणालो होतो आणि आम्ही २३२ थर लावून आमदार निवडून आणले आणि विजयाची हंडी फोडली. पेहलगाम हल्ला झाल्यानंतर पाकिस्तानची हंडी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आणि भारतीय लष्कराने फोडली. पाकिस्तानला त्यांची जागा दाखवून दिली. आता पाकिस्तानने पुन्हा थर लावण्याचा प्रयत्न केला तर त्यांची कायमची हंडी फोडून टाकायची असल्याचेही ते म्हणाले.

मुख्यामंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे टेंभी नाका उत्सवामध्ये एकाच व्यासपीठावर आले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापूर्वी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे या ठिकाणी दाखल झाले. त्यानंतर मुख्यमंत्री येईपर्यंत उपमुख्यमंत्री शिंदे याच ठिकाणी थांबले. त्यामुळे राज्यातील दोन्ही दिग्गज नेते एकाच व्यासपीठावर येण्याचा योग जुळून आला होता.

# जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी काम करुया

## पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्या हस्ते ध्वजारोहण

**सातारा/प्रतिनिधी:-**

महाराष्ट्र राज्याच्या जडणघडणीमध्ये विकासामध्ये, उभारणीमध्ये, प्रतिष्ठेमध्ये सातारा जिल्ह्याने आणि सातारा जिल्ह्याने दिलेल्या नेतृत्वाने, वेळोवेळी जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणाऱ्या लोकप्रतिनिधींनी फार महत्वपूर्ण योगदान दिले आहे, आज सातारा जिल्हा प्रगतीचे नवनवीन टप्पे गाठत राज्यातील मोजक्या जिल्ह्यांमध्ये पुढे आहे. याचा मला अभिमान आहे. जिल्ह्याला सर्वांगीण विकासामध्ये अग्रभागी ठेवण्यासाठी पालकमंत्री या नात्याने जिल्ह्यातील सर्व सहकारी मंत्री, सर्व खासदार व आमदारांच्या सहकार्याने व प्रशासनातील सहकारी अधिकाऱ्यांना बरोबर घेऊन जिल्ह्याला पुढे नेण्यासाठी प्रयत्न करीत आहे, याला सर्वांचे सहकार्य राहो, असे आवाहन राज्याचे पर्यटन मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात ७९ वा स्वातंत्र्य दिनानिमित्त राज्याचे पर्यटन, खनिकर्म व माजी सैनिक कल्याण मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्या हस्ते मुख्य शासकीय राष्ट्रध्वजारोण समारंभ संपन्न झाला. यावेळी जिल्हाधिकारी संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक तुषार दोशी, अपर जिल्हाधिकारी मल्लिकार्जुन माने, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता संतोष रोकडे, जिल्हा शल्यचिकीत्सक युवराज करपे, निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील यांच्यासह जिल्ह्यातील स्वातंत्र्य सैनिक, व त्यांचे परिवारजन यांच्यासह विविध विभागाचे प्रमुख अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी स्वातंत्र्य दिनानिमित्त जिल्हा वासियांना शुभेच्छा देऊन पालकमंत्री श्री. देसाई म्हणाले, या जिल्ह्याला थोर स्वातंत्रसेनानीची, सैन्यदलातील थोर वीर सुपूत्रांची खूप मोठी ऐतिहासिक परंपरा लाभलेली आहे. जिल्ह्यातील अनेक स्वातंत्र्यवीरांनी देश स्वातंत्र्य करण्यासाठी वेळप्रसंगी कारावास भोगून, भूमीगत राहून, प्राणांची आहूती देवून योगदान दिले. सातारा जिल्ह्याची राजकीय परंपरा सुद्धा खूप मोठी आहे अगदी महाराष्ट्र, गुजरात एकत्र मुंबई राज्य असताना सुद्धा या जिल्ह्याचे सुपुत्र स्व. यशवंतराव चव्हाण, स्व. लोकनेते बाळासाहेब देसाई यांनी राज्याचे नेतृत्व केले.

जिल्ह्याला पर्यटन जिल्हा म्हणून विकसित करत असताना करण्यात येत असलेल्या अनेक उपक्रम योजनांचा उल्लेख करुन पालकमंत्री श्री. देसाई म्हणाले, जागतिक वारसा स्थळांमध्ये ज्या १२ गडकोट किल्यांचा समावेश करण्यास युनेस्कोने मान्यता दिली आहे त्यातील ११ किल्ले आपल्या महाराष्ट्रातले आहेत. त्यातला प्रतापगड हा आपल्या सातारा जिल्ह्यातला किल्ला आहे. यूनेस्कोच्या यादीत समाविष्ट होण्यापूर्वी जिल्हा



नियोजन समितीमधून प्रतापगडाच्या संवर्धनासाठी २० कोटी रुपये आपण मंजूर केले होते. पर्यटन विभागाकडून शिवप्रताप दिनाचे महत्त्व असलेल्या व अफजल वध झालेल्या ठिकाणी विव्हींग गॅलरी मंजूर केली आहे. त्या ठिकाणी दुसऱ्या टप्प्यात छत्रपती शिवाजी महाराजांचा गनिमी कावा हा कसा होता व त्याचे महत्व हे चित्ररूपाने समजावे म्हणून पर्यटन विभागामार्फत संपूर्ण इतिहास दाखवण्याचे काम त्या ठिकाणी करणार आहोत.




### नॉनव्हेज..

मांसाहारा पर्याय नसे
खाणारे देतात दाखले
जीवोजीवस्यजीवनम्
ब्रीदवाक्य कसे रेखले
जीभेले लागलेचोचले
अगदीबरोबर जोखले
प्रोटिनसाठी नॉनवेज
पुरावे देतात खोकले
नवीन प्राणी खायला
आबाल वृद्ध शिकले
वटवाघूळसापविविध
सगळे जातात विकले
समस्तजीवांच्या हत्या
रे रक्ताने तोंड माखले
पापपुण्य विधी निषेध
सगळेअलगद झाकले
मासकुणीमहाग केले
कितीदागरळ ओकले
भाज्यापण महागल्या
उगांच कसले कोकले
शाकाहार करणा-या
नेहमीचं गौण रेखले
झाडपाला उगा खाई
खरेशाकाहारी चुकले

- हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६

# बेकायदेशीर घरगुती गॅस रिक्षात भरल्याप्रकरणी दोघांवर गुन्हा

**कराड/प्रतिनिधी:-**

कराड शहरासह मलकापूर परिसरात बेकायदेशीर विनापरवाना घरगुती गॅस रिक्षात भरण्याचे प्रकार दिवसेंदिवस समोर येत आहेत. त्यात भर पडली असून सैदापूर कॅनॉल ते मसूर जाणाऱ्या रोडवर सूर्या मस्तानी कॅफेच्या पाठीमागील बाजूस बेकायदेशीर विनापरवाना घरगुती गॅस टाकीतून पाईपच्या सहाय्याने रिक्षात गॅस भरताना पोलिसांनी कारवाई केली. यामध्ये पोलिसांनी चौदा हजारांचा मुद्देमाल जप्त केला. तसेच याप्रकरणी दोन जणांवर गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

याबाबतची फिर्याद पोलीस हवालदार महेश शिंदे यांनी कराड शहर पोलीस ठाण्यात दिली आहे.स्वप्निल सुनिल यादव (वय २८) रा. सैदापूर कॅनॉल, ता. कराड व शिवाजी जाधव अशी गुन्हा नोंद झालेल्यांची नावे आहेत.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, सैदापूर कॅनॉल ते मसूर जाणाऱ्या रोडवर सूर्या मस्तानी कॅफेच्या पाठीमागील बाजूस स्वप्निल यादव हा दररोज उघड्यावर बेकायदेशीर विनापरवाना सार्वजनिक जिवीतास व मालमत्तेस धोका होईल अशा स्थितीत घरगुती वापराचे गॅस सिलेंडर रिक्षामध्ये व अन्य वाहनामध्ये भरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्या माहितीच्या आधारे सहाय्यक पोलीस निरीक्षक राजेश माळी यांनी शनिवारी सकाळी ९.३० वाजण्याच्या सुमारास सैदापूर कॅनॉल ते मसूर जाणाऱ्या रोडवर सूर्या मस्तानी कॅफेच्या पाठीमागील बाजूस छापा टाकला असता तेथे स्वप्निल हा अवैधरित्या रिक्षात गॅस भरताना आढळून आला. पोलिसांनी त्याच्याकडे शासनाकडून परवाना घेतला आहे का?, तसेच सदरचे काम कोणासाठी करत असल्याचे विचारले असता त्याने सदरचे काम शिवाजी जाधव यांचेसाठी त्यांच्या सांगण्यावरून करत असल्याचे सांगितले. पोलिसांनी स्वप्निल याच्याकडून चार हजार रूपये किमतीचा इलेक्ट्रीक गॅस क्रॉम्प्रेसर, पाच हजार रूपये किमतीच्या घरगुती गॅस सिलेंडर टाक्या, ६०० रूपये किमतीचे दोन नोझल, चार हजार रूपये किमतीचा वजनकाटा असा एकूण १४ हजार रूपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.



# न्यायाच्या कोल्हापूर पर्वाला आजपासून सुरुवात

कोल्हापूरच्या न्यायिक इतिहासात १७ ऑगस्ट २०२५ हा दिवस सुवर्णाक्षरांनी लिहिला जाणार आहे. या दिवशी मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर येथील सर्किट बेंचचे उद्घाटन होत असून, सहा जिल्ह्यांसाठी न्यायदानाची एक नवी सोय उपलब्ध होणार आहे. भारताचे सरन्यायाधीश व महाराष्ट्राचे सुपुत्र माननीय श्री. न्यायमूर्ती भूषण रामकृष्ण गवई यांच्या शुभहस्ते, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत या बेंचचा शुभारंभ होणार असून, हा सोहळा न्यायदानाच्या विकेंद्रीकरणातील एक ऐतिहासिक टप्पा ठरणार आहे.

यानिमित्ताने कोल्हापूर नगरी या ऐतिहासिक घटनाक्रमाचे साक्षीदार होण्यासाठी उत्सुक आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या मार्गदर्शनात जिल्हा प्रशासनाने यासाठी जय्यत तयारी केली असून १७ ऑगस्टला होणाऱ्या या सोहळ्याची सर्व स्तरातील जनतेला प्रतीक्षा आहे.

**५० वर्षांच्या लढ्याचे यश**

कोल्हापूरसाठी सर्किट बेंचची मागणी मागील पाच दशकांपासून सुरू होती. विविध वकील संघटनांनी, सामाजिक संघटनांनी, विविध क्षेत्रातील मान्यवरांनी, माध्यमांनी आणि स्थानिक नेत्यांनी या मागणीसाठी सातत्याने प्रयत्न केले. २०१४ मध्ये पहिल्यांदा मुख्यमंत्रीपद स्वीकारल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनीही ही मागणी कायम ठेवली. त्यांच्या कार्यकाळात ही मागणी पूर्ण होत असल्याने विशेष आनंद त्यांनी व्यक्त केला आहे. ते उद्घाटन सोहळ्यास उपस्थित राहणार आहेत.

मुंबई उच्च न्यायालयाच्या विद्यमान नागपूर, छत्रपती संभाजीनगर आणि गोवा खंडपीठासोबत आता कोल्हापूरचे सर्किट बेंच न्यायव्यवस्थेत नवे स्थान घेणार आहे.

**उद्घाटन सोहळा, मान्यवरांची उपस्थिती**

१७ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता सी.पी.आर.हॉस्पिटल समोरील जुन्या न्यायालय इमारतीमध्ये या सर्किट बेंचचे उद्घाटन होणार आहे. हा सोहळा भारताचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण रामकृष्ण गवई यांच्या शुभहस्ते होईल.यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती अलोक अराधे, सार्वजनिक आरोग्य मंत्री व कोल्हापूरचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ तसेच न्यायमूर्ती मकरंद कर्णिक हे मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

**सहा जिल्ह्यांचा लाभ**

या सर्किट बेंचचा लाभ कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या सहा जिल्ह्यांना होणार आहे. याआधी या जिल्ह्यांतील नागरिकांना आपली प्रकरणे मुंबईत नेऊन लढावी लागत होती, ज्यासाठी वेळ, पैसा आणि श्रम यांचा मोठा खर्च होत असे.आता मात्र ही प्रकरणे कोल्हापुरातच चालवली जाणार असल्याने सर्वांसाठी मोठी सोय होणार आहे.

**प्रवीण टाके**
**उपसंचालक, कोल्हापूर विभागीय कार्यालय**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मुंबई**

सोलापूर वगळता इतर जिल्ह्यांना तीन-चार तासांत कोल्हापूर गाठता येते, तर सोलापूरलाही साधारण पाच तासांचा प्रवास करून कोल्हापुरात पोहोचता येईल.

**सर्किट बेंच आणि खंडपीठ - काय फरक?**

सर्किट बेंच म्हणजे न्यायालयाचे एक तात्पुरते ठिकाण,जेथे उच्च न्यायालयातील न्यायमूर्ती ठरावीक कालावधीत येऊन प्रकरणे चालवतात. याची स्थापना करण्याचा अधिकार राज्याच्या उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती यांना असतो आणि त्याचे नोटिफिकेशन राज्यपाल प्रसिद्ध करतात.

खंडपीठ मात्र कायमस्वरूपी स्वरूपाचे असते. यासाठी घटनात्मक प्रक्रिया आवश्यक असून, उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती प्रस्ताव तयार करून सर्वोच्च न्यायालयाकडे पाठवतात. त्यास मंजुरी मिळाल्यावर राष्ट्रपती नोटिफिकेशन काढतात.

दोन्ही ठिकाणी न्यायदानाची पद्धत आणि प्रक्रिया सारखीच असते.मात्र सर्किट बेंचमध्ये न्यायमूर्तींची नियुक्ती तात्पुरती असते,तर खंडपीठात ती कायमस्वरूपी असते.कोल्हापूरचे सध्याचे सर्किट बेंचही भविष्यात खंडपीठात रूपांतरित होण्याची शक्यता आहे.

**न्यायदानाची कार्यपद्धती**

या सर्किट बेंचमध्ये नागरी, फौजदारी, कामगार, मालमत्ता, सार्वजनिक हक्क अशा विविध प्रकारचे खटले चालणार आहेत. मात्र कंपनी क्ट, करसंबंधी प्रकरणे आणि एनआयए न्यायालयाशी संबंधित खटले मुंबईतील मुख्य न्यायालयातच चालतील.मुंबई, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर येथील न्यायमूर्ती तात्पुरत्या स्वरूपात कोल्हापूर येथे नियुक्त होऊन प्रकरणे चालवतील.

**कोल्हापूर- न्यायदानासाठी आदर्श केंद्र**

कोल्हापूर हे ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि धार्मिक वारशाचे केंद्र असून, येथे उत्तम लॉजिस्टिक सुविधा, हॉटेल्स, धर्मशाळा, शासकीय विश्रामगृहे यांचा उत्तम ताळमेळ आहे. त्यामुळे वकिलांना, पक्षकारांना आणि साक्षीदारांना मुक्काम व प्रवास सोयीस्कर होणार आहे. शिवाय कोल्हापूर हे सहा जिल्ह्यांच्या मध्यवर्ती ठिकाणी असल्याने हे स्थान न्यायदानासाठी आदर्श आहे.

**शेंडा पार्क येथे २५ एकर जमीन राखीव**

कोल्हापूर खंडपीठासाठी शेंडा पार्क येथे स्वतंत्रपणे २५ एकर जमीन राखीव ठेवण्यात आली आहे. याशिवाय खंडपीठ इमारत बांधकाम व आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी १०० कोटी रुपयांची तरतूदही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यापूर्वीच केली आहे.यामुळे आता या कामालाही गती येणार आहे. एक अद्यावत इमारत या ठिकाणी उभी येत्या काळात राहणार आहे.

**कोल्हापुरातील न्यायदानाची परंपरा**

न्याय,नीती, समता, न्यायदान यासाठी कोल्हापूर शहराचे दायित्व मोठे असून या शहराने १८६७ पासून न्यायव्यवस्थेला आपलेसे केले आहे.या शहरात पूर्वी 'राजा ऑफ कोल्हापूर ' या सहीने न्यायदान होत होते.महादेव गोविंद रानडे हे कोल्हापूरला पहिले न्यायाधीश होते.ब्रिटिश राजवटीतील काही ऐतिहासिक नोंदीनुसार १८९३ मध्ये



'कोल्हापूर स्टेट रूल्स ' म्हणून स्वतंत्र कायद्याचे पुस्तक होते.राजाराम महाराजांच्या काळात १९३१ मध्ये कोल्हापुरात स्वतंत्र हायकोर्ट व सुप्रीम कोर्ट स्थापन झाले होते.

**शाहू महाराजांच्या आदर्शाला सलाम**

भारतामध्ये न्यायदान भेदाशिवाय, निकोप, समानतेच्या तत्त्वावर असावे हा संदेश राजर्षी शाहू महाराजांनी दिला होता. कोल्हापूरच्या सर्किट बेंचचा शुभारंभ हा त्यांच्या विचारांना खरी आदरांजली आहे.

हे बेंच सुरू झाल्यामुळे न्यायाच्या दारी सर्वसामान्य माणसाला सहज पोहोचता येईल, न्यायासाठी होणारा खर्च आणि वेळ कमी होईल, आणि न्यायदानाची गती वाढेल. १७ ऑगस्टपासून सुरू होणारे हे सर्किट बेंच केवळ न्यायदानाची नवी सुविधा नाही, तर न्याय विकेंद्रीकरणाचा आणि न्याय सुलभतेचा एक भक्कम पाया आहे. पन्नास वर्षांच्या अथक प्रयत्नांना मिळालेलं हे यश, कोल्हापूरसह संपूर्ण पश्चिम महाराष्ट्रासाठी न्यायदानाच्या नव्या पर्वाची सुरुवात ठरणार आहे.

# खंडणी, मारहाण प्रकरणी परस्परविरोधी तक्रारी

***सातारा/प्रतिनिधी:***

खंडणी, मारहाण प्रकरणी सातारा शहर पोलीस ठाण्यात परस्परविरोधी तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १४ रोजी दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास एसटी स्टँड जवळील दत्त मंदिर रिक्षा स्टॉप येथे जिलेबी चा मांडव घालण्याच्या कारणावरून उमेश अरुण त्रिंबके रा. मल्हार पेठ, सातारा यांना ५००० ची खंडणी मागून, मारहाण करून धमकी दिल्या प्रकरणी गिरीश खंदारे, श्री खंदारे, आकाश उर्फ गोट्या खंदारे, अथर्व खंदारे, निलेश खंदारे आणि इतर दोन जणांविरोधात सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास महिला पोलीस नाईक कदम करीत आहेत.

दरम्यान, गिरीश महादेव खंदारे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, महेश अरुण त्रिंबके, उमेश त्रिंबके, चाणक्य उमेश त्रिंबके आणि उमेश त्रिंबके यांचे तीन मित्र यांच्या विरोधात मारहाण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस हवालदार भोंडवे करीत आहेत.

# ग्रीन पॉवर शुगर्स डोंगराई दूधसंघातर्फे ध्वजवंदन

***कडेगांव : प्रतिनिधी***

कडेपूर ता. कडेगांव येथील संपतराव देशमुख को-ऑपरेटिव्ह मिल्क युनियन डोंगराई दूध संघ कार्यस्थळावर ७९ व्या स्वातंत्र दिनानिमित्त संस्थेचे अध्यक्ष सांगली जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संग्राम भाऊ देशमुख यांच्या हस्ते तर गोपूज येथे ग्रीन पॉवर शुगर्स कारखाना कार्यस्थळावर जनरल मॅनेजर झुंझार आसबे यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले.

या वेळी दोन्ही संस्थेचे संचालक मंडळ सर्व खाते प्रमुख, कर्मचारी वर्ग प्रमुख उपस्थित होते.



कडेपूर येथे संपतराव देशमुख को ऑफ मिल्क युनियन डोंगराई दूध संघ या ठिकाणी संस्थेचे अध्यक्ष संग्राम भाऊ देशमुख यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले.

# स्वातंत्र्य दिनानिमित्त उत्तर पोलिस ठाण्याच्या वतीने भव्य रक्तदान शिबीर संपन्न

***अक्कलकोट/प्रतिनिधी:***

स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने उत्तर पोलिस ठाण्यात उत्साहात रक्तदान शिबिराजे आयोजन करण्यात आले होते.

आज शुक्रवार दि.१५/०८/२०२५ रोजी ७९ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे येथे *रक्तदान शिबिराचे* आयोजन केलेले होते. सदर रक्तदान शिबिरात ३७९ रक्तदात्यांनी रक्तदान केले.. हे रक्तदान शिबिर हे मा.पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी साहेब, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतमकुमार यावलकर साहेब, उपविभागीय पोलीस अधिकारी, विलास यामावर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली सदरचे रक्तदान शिबिर यशस्वीरित्या पार पडलेले आहे. सदरचे रक्तदान शिबीरासाठी सोलापूर येथील सिद्धेश्वर ब्लड सेंटर, सोलापूर यांचे जनसंपर्क अधिकारी नागेश तोलाराम चव्हाण



व महात्मा बसवेश्वर ब्लड सेंटर, सोलापूर याचे जनसंपर्क अधिकारी संतोष गोविंद थोरात यांचे व त्यांचे इतर सर्व कर्मचारी सह हजर होते.सदरच्या रक्तदान शिबिराकरिता अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे कडील पोलीस अधिकारी,पोलिस अंमलदार व पोलीस पाटील यांचे सहकार्य लाभलेले आहे. हे शिबिर संपन्न करण्यासाठी उत्तर पोलिस ठाण्यातील अनेक पोलिस कर्मचारी व अधिकारी यांनी परिश्रम घेतले.

> स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने उत्तर पोलिस ठाण्याच्या वतीने रक्तदान शिबिराजे आयोजन करण्यात आले होते. शुक्रवारदि.१५/०८/२०२५ रोजी ७९ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे येथे हे रक्तदान शिबिर पार पडले या रक्तदान शिबिरात जवळपास ३७९ पोलिस रक्तदात्यांनी रक्तदान केले आहे.. हे रक्तदान शिबिर एक सामाजिक बांधिलकी म्हणून आम्ही हे कर्तव्य पार पाडले आहे.
>
> राजेंद्र टाकणे
> पोलीस निरीक्षक,अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे

# अक्कलकोट आगारात उत्साहात ध्वजारोहण

***अक्कलकोट/प्रतिनिधी:***

अक्कलकोट आगारात स्वातंत्र्य दिनानिमित आगार व्यवस्थापक रणजीत साळवे यांच्या हस्ते उत्साहात ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहण झाल्या नंतर उपस्थित सर्व कर्मचारी आणि अधिकारी यांना धूम्रपान न करण्याबाबत शपथ देण्यात आली. या प्रसंगी बोलताना आगार व्यवस्थापक रणजीत साळवे यांनी सर्व कर्मचारी आणि अधिकारी यांनी सामूहिक रित्या योग्य नियोजन करून आणि परिश्रम घेऊन अक्कलकोट आगाराचे भारमान आणि के पी टी एल वाढविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने




यावेळी त्यांनी सर्व कर्मचाऱ्यांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी उत्कृष्ट कामगिरी पार पाडलेल्या आणि आदर्श काम करत असलेल्या कर्मचाऱ्यांचा सत्कार आगार व्यवस्थापक रणजीत साळवे यांनी केला. या वेळी कार्य शाळा अधीक्षक संजय कांबळे, अक्कलकोट आगाराचे वाहतूक निरीक्षक पी.पी.हनगल, नागेश रोडगे, वाहतूक नियंत्रक मदन घाटगे, श्रीमंत खसगी माजी वाहतूक नियंत्रक विठ्ठल सोनकांबळे, आगार लेखाकार कोपा साहेब, वरिष्ठ लिपीक शिंदे शिफ्ट इन चार्ज एम के पाटील तसेच लिपीक प्रशांत फडतरे, भगवान कल्याणकर अनिल पाटील, अक्षय बोलदे वाहन परीक्षक वसंत बंडगर यांच्यासह राहुल स्वामी वाहन महेश गायकवाड व इतर अनेक कर्मचारी उपस्थित होते

# प्रेम, जिद्द आणि कलेचं बीज पेरणारा 'झिंग' चित्रपट १९ सप्टेंबरपासून जवळच्या सिनेमागृहात

स्वप्न प्रत्येकजण पाहत असतो. कुणी आई-वडिलांचं, कुणी स्वतःच तर कुणी पत्नीचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी धडपडत असतं. स्वप्न पाहणं आणि ते पूर्ण करणं यांत खरं साहस आहे. स्वप्न पूर्ण करण्यात लागलेल्या एका किसनाची कथा लवकरच मोठ्या पडद्यावर पाहायला मिळणार आहे. गावातील उनाड पण मनाने सच्चा आणि स्वप्नवेड्या किसनाच्या वडिलांच अपूर्ण राहिलेलं तमाशाचा फड उभारण्याचं राहिलेलं स्वप्न उराशी बाळगणाऱ्या या मेहनती लेकाचा प्रवास झिंग या नव्याकोऱ्या 'झिंग' या चित्रपटातून रुपेरी पडद्यावर पाहायला मिळणार आहे. येत्या १९ सप्टेंबरपासून हा सिनेमा प्रदर्शित होणार आहे.

टाळ्या, शिट्ट्यांच्या गजरात ही मैफिल किसना कशी रंगवणार हे पाहणं या चित्रपटात रंजक ठरेल.आजोबांचा विरोध, गावकऱ्यांचा अविश्वास आणि पाटलांचं राजकारण यांतून मार्ग काढत किसना वडिलांचं अपूर्ण राहिलेलं स्वप्न पूर्ण करण्यासाठी रंगमंच गाजवणार का?, हा




कठीण प्रवास तो पार करणार का? हे सारं चित्रपटात पाहायला मिळेल. बरं चित्रपटात दिसणारा हा किसना नेमका कोण आहे, ही रंगतदार भूमिका कोण साकारतय याकडे साऱ्यांच्या नजरा लागून राहिल्या आहेत. शिवाय चित्रपटात आणखी कोणते कलाकार दिसणार हेदेखील अद्याप गुलदस्त्यात ठेवण्यात आले आहे. गावच्या मनात प्रेम, जिद्द आणि कलेचं बीज किसना पेरु शकेल का? की, हे सगळं फक्त त्याच्या स्वप्नांपुरतच सिमीत राहील याचाही उलगडा लवकर होईल.

'ड्रीम लालटन प्रॉडक्शन' आणि 'रेडब्रिक्स मोशन पिक्चर' या प्रॉडक्शन हाऊस अंतर्गत निर्माते दिपक पेटकर आणि सौरभ किरणकुमार कुंभार निर्मित 'झिंग' हा चित्रपट दिग्दर्शक अमित वाल्मिक कोळी दिग्दर्शित आहे. तर हा संपूर्ण चित्रपट प्रताप जोशी यांनी त्यांच्या कॅमेऱ्यात कैद केला आहे. तर संगीतकार पद्मनाभ गायकवाड यांचे संगीत या चित्रपटाला लाभले आहे. मुकुंद भालेराव, मंदार चोळकर आणि शुभम चौधरी यांनी गाण्याचे बोल लिहिले आहेत. तर नृत्य दिग्दर्शक म्हणून आशिष पाटील यांनी बाजू सांभाळली आहे. 'झिंग' हा चित्रपट संगीतमय मैफिलीत अनेक रंग भरणारा आहे. येत्या १९ सप्टेंबरपासून हा चित्रपट जवळच्या सिनेमागृहात प्रदर्शित होईल.

# अशिक्षित लोक ध्वजारोहणा पासून वंचित राहू नये म्हणून स्वत:च्या शेतातील वसाहतीमध्ये केला स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

***अक्कलकोट/प्रतिनिधी:***

अशिक्षित नागरिक अशिक्षित समाज ध्वजारोहणा पासून वंचित राहू नये म्हणून आपण आपल्या शेतातील वस्तीवर स्वातंत्र्य दिन समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन वंचित लोकांना सोबत घेऊन कामगार कष्टकरी लोकांना सोबत घेऊन उत्साहात ७९ वा भारतीय स्वातंत्र्य दिन साजरा करून या लोकांच्या जीवनात आनंद आणि उत्साह फुलविण्याचे काम येथील जुने मल्ल आणि अक्कलकोट तालीम संघाचे अध्यक्ष व ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि प्रगतशील शेतकरी महेश पैलवान कुलकर्णी यांनी केले आहे.

वंचित घटकांना आणि अशिक्षित लोकांना स्वातंत्य दिनानिमित्त बोलावून त्यांना सोबत घेऊन आपल्या शेतात सामाजिक कार्यकर्ते आणि जेष्ठ मल्ल महेश पैलवान यांनी स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा केला.

> सर्व धर्मीय अशिक्षित समाज वर्ग ध्वजारोहणापासून वंचित राहू नये म्हणून स्वतःच्या शेतातील वस्तीवर आपण पत्नी, आई ,मित्र , कामगार वर्ग आणि शेजारील विद्यार्थी यांच्यासमवेत स्वातंत्र्य दिन साजरा केला आहे अनेक लोकांना झेंडा वंदन म्हणजे काय हे माहिती नाही. स्वातंत्र्य दिन म्हणजे काय हे माहिती नाही. म्हणून आपण समाजातील सर्व वंचित घटकांना आणि दुर्बल लोकांना सोबत घेऊन आपल्या स्वतःच्या वसाहती मध्ये ध्वजारोहण केले आहे.
>
> महेश पैलवान कुलकर्णी
> अक्कलकोट

सर्व धर्मीय अशिक्षित समाज वर्ग ध्वजारोहणापासून वंचित राहू नये म्हणून स्वतःच्या पत्नी, आई ,मित्र , कामगार वर्ग आणि शेजारील विद्यार्थी यांच्यासमवेत महेश पैलवान कुलकर्णी यांनी स्वतःच्याच वसाहती मध्ये ध्वजारोहण केले आणि समाजासमोर मोठा आदर्श घालून दिला आहे.

ध्वजारोहण झाल्यानंतर राष्ट्रध्वजास राष्ट्रगीताने मानवंदना देऊन सर्वांना बुंदीचे लाडू वाटून स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या . यापैकी काही वृद्ध महिला व पुरुषांनी आपल्या जीवनात पहिल्यांदाच राष्ट्रध्वजास सलामी देण्याचा योग तुमच्यामुळे घडून आला अशी प्रतिक्रिया व्यक्त केली. असे देशभक्तीपर , सामाजिक राष्ट्रीय




कार्यक्रम गोरगरिबांना घेऊन आपल्या येथे साजरा करण्याचा मानस अक्कलकोट तालुका तालीम संघाचे अध्यक्ष श्री महेश पैलवान कुलकर्णी यांनी व्यक्त केला आहे.

याप्रसंगी श्रीमंत मोरे, श्रावण मोरे ,दुशलाबाई मोरे , रेहाना तांबोळी ,इस्माईल तांबोळी, लैला शेख,सुनीताबाई ,राजू कोळी मेकॅनिक अंबणा गवंडी मिस्त्री, मारुती मुळे महादेव मोरे , पद्मावती कुलकर्णी, वर्षा बाई देशपांडे, विद्यार्थी वर्गआणि स्वतः श्री महेश पैलवान कुलकर्णी आणि त्यांच्या सुविद्य पत्नी सौ गायत्री कुलकर्णी हे उपस्थित होते.

# 'टँगो मल्हार' या चित्रपटातून उलगडणार एका रिक्षा चालकाचा प्रेरणादायी प्रवास

चित्रपट या माध्यमाची जादू काही औरच आहे. कोणत्याही क्षेत्रात काम केलं, तरी स्वतः चित्रपट करण्याची उर्मी काहींना स्वस्थ बसू देत नाही. संगणक शास्त्रज्ञ तसेच उद्योजिका असलेल्या साया दाते यांनी आगामी 'टँगो मल्हार' या चित्रपटाची निर्मिती आणि दिग्दर्शन केले आहे. नुकतेच या चित्रपटाचे पोस्टर सोशल मीडियावर लॉन्च करण्यात आले असून येत्या १९ सप्टेंबरला हा चित्रपट संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे.

टँगो मल्हार या चित्रपटाची निर्मिती गलेट्स अँड आयलेट्स प्रॉडक्शन या निर्मिती संस्थे अंतर्गत करण्यात आली असून साया दाते या निर्मात्या आहेत. टँगो मल्हार या चित्रपटात एका रिक्षा चालकाची गोष्ट उलगडण्यात आली आहे. काहीतरी नवीन करू पाहणाऱ्या तरुण अशा मल्हारला अचानकपणे टँगो या अर्जेंटिनाच्या नृत्य प्रकाराचा शोध लागतो आणि त्याची आवड निर्माण होते. या नृत्य प्रकारामुळे त्याच्या




आयुष्यात काय काय गोष्टी रंजकपणे घडत जातात या कथासूत्रावर 'टँगो मल्हार' हा चित्रपट बेतला आहे.चित्रपटाच लेखन साया दाते, मनीष धर्मानी यांनी केले आहे. सुमेध तरडे, ओंकार आठवले यांनी छायांकन, क्षमा पाडळकर यांनी संकलन, तुषार कांगारकर यांनी ध्वनी आरेखन, शार्दूल बापट, उदयन कानडे यांनी संगीत आणि पार्श्वसंगीत केलं आहे. चित्रपटात नितेश कांबळे, कीर्ति विश्वनाथन, सीमा वर्तक, अक्षय गायकवाड, मनीष धर्मानी, मनीषा महालदार, संदेश सूर्यवंशी, पंकज सोनावणे या नवोदित कलाकारांचा अभिनय आपल्याला पहायला मिळणार आहे.

साया दाते यांनी अमेरिकेतील प्रतिष्ठित मॅसेच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (एमआयटी) येथून मॅकेनिकल इंजिनिअरिंगचं शिक्षण घेतलं. त्यानंतर त्यांनी दहा वर्षं तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात काम करताना अमेरिकेतील सिलिकॉन व्हॅलीत युट्यूबमध्ये काम केलं, त्यानंतर भारतात परत येऊन पुण्यात स्वतःची कंपनी उभी केली. उद्योग क्षेत्रातील कामगिरीसाठी प्रतिष्ठित फोर्ब्जच्या '३० अंडर ३०' या यादीत त्यांना स्थान मिळालं होतं.

साया यांच्यात चित्रपट प्रेमाचं बीजं बालपणीच पेरलं गेलं होतं. वयाच्या १२व्या वर्षी त्यांनी 'ऑन द अदर लाइन' ही शॉर्टफिल्म दिग्दर्शित केली होती. अनेक आंतरराष्ट्रीय महोत्सवात सुद्धा ही शॉर्टफिल्म गौरवली गेली. त्याशिवाय त्या स्वतः टँगो डान्सरही आहेत. त्यामुळे एकीकडे तंत्रज्ञान, उद्योगात उत्तम काम करत असताना कलेची आवड त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. त्यामुळे आपली आवड जपण्यासाठी त्यांनी 'टँगो मल्हार' चित्रपटातून चित्रपटसृष्टीत पाऊल टाकले आहे. त्यामुळे एका संगणक शास्त्रज्ञ, उद्योजिकेचा मराठी चित्रपट निर्मिती, दिग्दर्शनाचा प्रयत्न नक्कीच उत्सुकता वाढवणारा आहे यात शंका नाही.

# पडद्यावरून थेट हृदयात: सोनी सबवरील 'इत्ती सी खुशी' मालिकेतील अन्विताच्या हृदयस्पर्शी कौटुंबिक संघर्षात सुम्बुल तौकीर खानच्या संघर्षाचे प्रतिबिंब दिसते

सोनी सबवर लवकरच 'इत्ती सी खुशी' मालिका सुरू होणार आहे, पण त्या अगोदरच मालिकेचे हृदयस्पर्शी कथानक आणि अन्विता दिवेकर या केंद्रवर्ती व्यक्तिरेखेने प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले आहे. सुम्बुल तौकीर खानने साकारलेली अन्विता ही एक धडाडीची तरुणी आहे, जी स्वतःच्या खंबीर खांद्यावर आपल्या कुटुंबाचा भार वाहत आहे. सुम्बुल एक ताकदीची अभिनेत्री आहे, त्यामुळे तिने साकारलेली अन्विता प्रेक्षकांना नक्कीच खिळवून ठेवेल आणि या गोष्टीचे स्मरण देईल की अशा काही छोट्या छोट्या गोष्टी असतात, ज्या कुटुंबाला एकसंध ठेवतात.

अन्विता एक काल्पनिक व्यक्तिरेखा असली, तरी ती खूप जिवंत, हाडामासाची व्यक्तिरेखा आहे. आणि सुम्बुलच्या जीवनाशी तिचे बरेच साधर्म्य आहे. या मालिकेत अन्विता सहा भावंडांमध्ये सर्वात मोठी आहे. आई सोडून गेल्यावर आणि



वडील व्यसनाधीन झाल्यावर कुटुंबाची जबाबदारी तिच्यावर येऊन पडली आहे. आपल्या भावंडांना काही कमी पडू नये म्हणून तिने आपले तारुण्य, आपली स्वप्ने, स्वतःचे सुख दूर सारले आहे. पडद्याच्या मागे सुम्बुल तौकीर खानच्या कहाणीतील परिस्थिती वेगळी असली, तरी जबाबदारीची जाणीव, भावनिक परिपक्वता आणि मूक चिवटपणा अन्विताप्रमाणेच आहे.

सुम्बुलसाठी अन्विताची व्यक्तिरेखा साकारणे हा एक अत्यंत भावनिक आणि वैयक्तिक अनुभव आहे. या व्यक्तिरेखेच्या अंतरंगात तिच्या स्वतःच्या प्रवासाचे प्रतिबिंब आहे. त्यामुळे ही भूमिका तिच्या अंतःकरणाच्या खूप जवळची आहे. अन्विताची भूमिका करताना आपल्या स्वतःच्या जीवनातील काही क्षण ती पुन्हा अनुभवत आहे. अन्विताचा मूक संघर्ष, समजूतदारपणे उचललेली जबाबदारी आणि संसाराचा गाडा रेटण्यासाठी लागणारी हिंमत ती समजू शकते. लहान वयातच एक आई, संरक्षक आणि प्रदाता बनलेल्या अन्विता प्रमाणे सुम्बुल देखील अकाली प्रौढ आणि समजूतदार झालेली मुलगी आहे. सिंगल पॅरेंटकडे वाढलेल्या सुम्बुलला देखील लवकरच आपल्या जबाबदारीची जाणीव झाली आणि आपल्या वडिलांना आणि लहान बहिणीला आधार द्यावा लागला.

'इत्ती सी खुशी' मालिकेत अन्विताची भूमिका साकारण्याबाबत सुम्बुल तौकीर खान म्हणते, अन्विता ज्या समजूतदारपणे आपल्या कुटुंबाचे दुःख सोसते, कुटुंबाला ओझे न मानता आपली जबाबदारी मानते, त्याच्याशी मला स्वतःचे साम्य दिसते. ही अशी भूमिका आहे, जी माझ्यातील कलाकाराला आव्हान देते आणि त्याच बरोबर माझ्या जीवनातील काही तुकडे पडद्यावर साकारण्याची संधीही देते. माझ्या आयुष्यात देखील एक काळ असा होता, जेव्हा जीवन अनिश्चित होते, मी माझ्या वडिलांना, बहिणीला आणि कुटुंबाला चांगले भविष्य मिळावे म्हणून धडपड करत होते. अन्विता प्रमाणे माझाही या गोष्टीवर विश्वास आहे की, चिकाटीमधून ताकद येते आणि हेच तत्वज्ञान मी स्वतःच्या जीवनात रुजवले आहे. बघा, 'इत्ती सी खुशी' सोमवार, १८ ऑगस्टपासून रात्री ९ वाजता फक्त सोनी सबवर

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक श्री.शशिकांत आकाराम पाटील यांनी प्रीतिसंगम प्रिंटर्स, कोयना औद्योगिक वसाहत, मलकापूर-कराड येथे छापून गोदावरी प्लाझा, हेड पोस्टाजवळ, शनिवार पेठ कराड, येथे प्रसिद्ध केले आहे. या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. R.N.I.No.MAHMAR./२००१/१०३३८ रजिस्टर No.MAHMAR/14511/13/1/96/Te पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 *मुख्य कार्यालय:- गोदावरी प्लाझा, हेड पोस्ट जवळ, शनिवार पेठ कराड, जि.सातारा, पिनकोड - ४१५११० फोन (०२१६४)२२७७२५,,फॅक्स २२६९२५, * सातारा कार्यालय:- संजीवन सीटी स्कॅन शेजारी, सिव्हील हॉस्पिटल रोड, सातारा फोन नं:-९२२६३९८८१७ RNI.mar/२००१/१०३३८.
email-pritisangamkarad@gmail.com

# जनता आणि सरकारमध्ये समन्वय म्हणून काम करणार

## पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांची संकल्पना

**सांगली / प्रतिनिधी:**

सर्वसामान्यांसाठी केंद्र आण राज्य शासनाच्या अनेक कल्याणकारी योजना कार्यान्वित आहेत. या योजनांचा लाभ प्रत्येक पात्र, गरजू आणि वंचितापर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे. शासकीय योजनांचा लाभ सर्वसामान्यांना मिळवून देण्यासाठी समन्वय यंत्रणा म्हणून पालकमंत्री कार्यालय हेल्पलाईन उपयुक्त ठरेल, असा विश्वास राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण, संसदीय कार्य मंत्री तथा सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केला.

सांगली जिल्ह्यासाठी नाविन्यपूर्ण सेवा प्रकल्पअंतर्गत पालकमंत्री कार्यालय (जीएमओ) हेल्पलाईनचे उद्घाटन केल्यानंतर आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. यावेळी माजी मंत्री आमदार डॉ. सुरेश खाडे, आ. सुधीर गाडगीळ, आ. सदाभाऊ खोत, आ. सत्यजीत देशमुख, जिल्हाधिकारी अशोक काकडे, पोलीस अधीक्षक संदीप घुगे, दीपक शिंदे म्हैसाळकर, संग्राम महाडिक, निशिकांत पाटील उपस्थित होते.

'विकसित भारत, विकसित महाराष्ट्र, विकसित सांगली जिल्हा' हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून पालकमंत्री पाटील यांच्या संकल्पनेतून पालकमंत्री कार्यालय (जीएमओ) हेल्पलाईन सुरू करण्यात आली आहे. या माध्यमातून केंद्र व राज्य शासनाच्या सर्व योजना जलद व सुलभ पद्धतीने नागरिकांपर्यंत पोहोचवणे, त्याबाबत मार्गदर्शन करणे, जिल्हा स्तरावरील तक्रारींचे त्वरित निवारण करणे व विविध शासकीय विभागांत समन्वय साधून सेवा अधिक गतिमान करण्याचा संकल्प स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून करण्यात आला. पालकमंत्री कार्यालय हेल्पलाईन संपर्क क्रमांक ८८०६०८८०६४ असून helplinegmosangli.in असा ईमेल आहे. पालकमंत्री यांचे विशेष कार्यकारी अधिकारी बाळासाहेब यादव यांच्याशी समन्वय ठेवून

सेवा, सुशासन व गरीब कल्याणाचे उद्दिष्ट गतिशील करणे हा हेतू ठेवून पालकमंत्री कार्यालय (जीएमओ) हेल्पलाईन सुरू केली असल्याचे सांगून पालकमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, सर्वसामान्यांसाठी शासनाच्या अनेक कल्याणकारी योजना कार्यान्वित आहेत. मात्र, तळागाळापर्यंत त्यांची माहिती नसल्याने अनेक पात्र नागरिक त्यापासून वंचित राहतात. त्यामुळे या उपक्रमाच्या माध्यमातून असे वंचित पात्र नागरिक शोधणे, त्यांना योजनांची व आवश्यक कागदपत्रांची माहिती सोप्या व सुलभ पद्धतीने देणे व योजनांचा लाभ देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, हे सांगताना त्यांनी पुण्यात सुरू केलेल्या महिलांचे आरोग्य जपणारा सुखदा उपक्रम, शासकीय



तंत्रनिकेतनमधील प्रवेशासाठी स्कूल कनेक्ट योजना, सारथी, स्वाधार योजना, सुकन्या समृद्धी योजना आदिंची सविस्तर माहिती दिली.

प्रारंभी रिमोटची कळ दाबून या उपक्रमाचे आभासी पद्धतीने उद्घाटन करण्यात आले. यावेळी आ.

खोत, सत्यजीत देशमुख आणि डॉ. सुरेश खाडे, दीपक शिंदे म्हैसाळकर, रमाकांत मालू यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक विजय वरूडकर यांनी तर आभार नरेंद्र यरगट्टीकर यांनी मानले. विशाल कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमास जिल्ह्यातील विविध लोकप्रतिनिधी, शासकीय अधिकारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अखेर आंदोलनाला यश


## कराड-ओगलेवाडी मार्ग उजेडात

**कराड/प्रतिनिधी : -**

कराड तालुक्यातील सैदापूर कृष्णा कॅनॉल चौक ते गजानन हौसिंग सोसायटी या राष्ट्रीय महामार्गावरील पथदिवे गेल्या अनेक दिवसांपासून बंद असल्याने परिसर अंधारात बुडाला होता. त्यामुळे अपघातांचा धोका वाढला होता. या प्रश्नाच्या निराकरणासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांनी आंदोलनाचा मार्ग अवलंबला होता. अखेर आंदोलनाला यश मिळून रस्ता पुन्हा उजेडात न्हाऊन निघाला आहे.

हजारामची गावचे उपसरपंच प्रशांत यादव, सैदापूरचे सरपंच फत्तेसिंह जाधव, तसेच बनवडी गावचे माजी सरपंच शंकर (बापू) खापे यांनी तीन दिवसांपूर्वी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना निवेदन देऊन प्रश्न मार्गी लावण्यासाठी ठाम भूमिका घेतली होती. प्रश्न सोडवा, अन्यथा तीव्र आंदोलन करू असा इशाराही देण्यात आला होता.

या निवेदनाची दखल घेत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने तातडीने कार्यवाही करून पथदिवे सुरु केले. परिणामी कराड-ओगलेवाडी मार्ग आज पुन्हा प्रकाशमान झाला आहे. दीर्घकाळानंतर हा प्रश्न सुटल्याने परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले. सामूहिक प्रयत्नातून हे यश मिळाले असून, नागरिकांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून येत असल्याच्या प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत.



# सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात बेल्जियन शेफर्ड श्वानपथक दाखल

**कराड/प्रतिनिधी : -**

वन्यजीव संरक्षण व शिकारविरोधी कारवायांना आधुनिक तंत्रज्ञानासह प्रशिक्षित साधनांची जोड मिळावी, या उद्देशाने सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात बेल्जियन शेफर्ड या विशेष जातीचे श्वान दाखल झाले आहे. या श्वानाचे नाव बेल्जी असून, ते १५ ऑगस्ट पासून कोल्हापूर वनविभागात सेवा बजावू लागले आहे.

राष्ट्रीय कुत्र्यांसाठी प्रशिक्षण केंद्र (एनटीसीडी) इंडो तिबेटीयन सीमा सुरक्षा दल, पंचकुला (हरियाणा) येथे तब्बल २८ आठवड्यांच्या खडतर प्रशिक्षणानंतर वनरक्षक कुमारी सारिका जाधव (फिरते पथक) यांना मुख्य हँडलर आणि वनरक्षक अनिल कुंभार (पाटण) यांना सहायक हँडलर म्हणून या श्वानासोबत कार्य करण्यासाठी सज्ज करण्यात आले.

या प्रशिक्षणाकरिता ट्रॅफिक इंडिया या आंतरराष्ट्रीय अशासकीय संस्थेमार्फत 'बेल्जियन शेफर्ड' जातीचे श्वान उपलब्ध करून देण्यात आले होते. ही संस्था वनस्पती व प्राण्यांच्या व्यापारावर लक्ष ठेवणारी, थथऊ व खणउछ यांच्या संयुक्त कार्यक्रमांतर्गत कार्यरत जागतिक पातळीवरील आघाडीची संघटना आहे.

सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात दाखल झालेले हे आधुनिक श्वानपथक आता वन्यजीव संरक्षणाची ताकद वाढवणार आहे. यामुळे शिकारविरोधी कारवाया अधिक परिणामकारक होतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

**प्रथम क्रमांकाचा मान**

देशभरातील आठ राज्यांतील १४ श्वान व त्यांच्या हँडलर्सनी या प्रशिक्षणात भाग घेतला होता. प्रशिक्षणादरम्यान घेण्यात आलेल्या प्रात्यक्षिक आणि लेखी परीक्षेत सह्याद्री व्याघ्र राखीवातील कुमारी सारिका जाधव व श्वान बेल्जी यांनी



प्रथम क्रमांक पटकावत संपूर्ण देशात आपला ठसा उमटवला.

**बेल्जियन शेफर्डचे वैशिष्ट्य**

बेल्जियन शेफर्ड जातीची श्वाने त्यांच्या बुद्धिमत्ता, चपळता व तीव्र वास घेण्याच्या क्षमतेसाठी जगभरात प्रसिद्ध आहेत. ही श्वाने शिकारविरोधी कारवाई, बेकायदेशीर वन्यजीव व्यापार शोधणे, संरक्षित प्राण्यांची तस्करी रोखणे, वृक्षतोडीविरोधी मोहिमा, ड्रग्ज व स्फोटके शोधणे अशा विविध संवेदनशील मोहिमांमध्ये प्रभावी ठरतात. त्यामुळे वन्यजीव व पर्यावरण रक्षणाच्या मोहिमेत ही श्वाने महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात.

> सह्याद्री व्याघ्र राखीवमधून कुमारी सारिका जाधव यांनी 'ऊस्र क्रपवश्रशी' म्हणून राष्ट्रीय पातळीवर प्रथम क्रमांक पटकावणे, ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे. ट्रॅफिक इंडिया थथऊच्या माध्यमातून मिळालेल्या 'इशश्रसळरप डहशहिशीव' जातीच्या श्वानामुळे विभागाची कार्यक्षमता व गती निश्चितच वाढेल,
>
> - तुषार चव्हाण (संचालक, सह्याद्री व्याघ्र राखीव)

### शंभर दिवसांच्या कार्यालयीन सुधारणेच्या विशेष मोहिमेतील कामगिरीबद्दल

# सातारा जिल्हा माहिती कार्यालयाचा पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्याहस्ते सन्मान

**सातारा/प्रतिनिधी:-**

राज्य शासनाच्या १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिमेंतर्गत केलेल्या उत्कृष्ट कार्यबद्दल जिल्हा माहिती अधिकारी वर्षा पाटोळे यांना राज्याचे पर्यटनमंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्याहस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

जिल्हाधिकारी कार्यालयात ७९ वा स्वातंत्र्य दिनानिमित्त राज्याचे पर्यटन, खनिकर्म व माजी सैनिक कल्याण मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्या हस्ते मुख्य शासकीय राष्ट्रध्वजारोण समारंभ संपन्न झाला. यावेळी झालेल्या कार्यक्रमात प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले. याप्रसंगी जिल्हाधिकारी संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक तुषार दोशी, अप्पर जिल्हाधिकारी मल्लिकार्जुन माने यांच्यासह जिल्हा माहिती कार्यालयातील कर्मचारी राहूल पवार, वैभव जाधव, रुपाली तारळकर, अनिल नलवडे, सचिन राऊत, अनिता काशिद उपस्थित होते.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार राज्यात १०० दिवसांची कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिम राज्य, विभाग, जिल्हा व तालुका स्तरांवरील एकूण १२ हजार ५०० शासकीय कार्यालयांमध्ये यशस्वीपणे राबविण्यात आली. या मोहिमेमध्ये जिल्हा माहिती अधिकारी या गटातून राज्यस्तरावर जिल्हा माहिती कार्यालय सातारास तृतीय क्रमांकाने निवडण्यात आले आहे.

जिल्हा माहिती कार्यालय हे नेहमीच माध्यमाभिमुख राहिले असून शासनाच्या विविध योजना, उपक्रम, कार्यक्रम निर्णय निर्देश यांना प्रिंट, इलेक्ट्रॉनिक आणि समाज माध्यमांमधून व्यापक प्रसिध्दी देण्याचे काम हे कार्यालय अव्याहतपणे करत असते. शासन आणि प्रसारमाध्यमे यांच्यामधला दुवा म्हणून हे कार्यालय महत्वाची भूमिका बजावते. माहिती व जनसंपर्क विभागाचे महासंचालक ब्रिजेश सिंह, संचालक हेमराज बागूल, किशोर गांगुर्डे, गणेश मुळे तसेच पुणे विभागाचे माहिती उपसंचालक डॉ. किरण मोघे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा माहिती कार्यालयाने १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिमेमध्ये अभिलेख निंदणीकरण व वर्गीकरण, जूने संगणक, व इतर निरुपयोगी साहित्यांचे निर्लेखन, कार्यालयाचे सौंदर्यीकरण यावर भर दिला. कार्यालयामध्ये येणाऱ्या अभ्यागतांसाठी बैठकव्यवस्था, व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था यासोबतच वाचनासाठी विविध मासिके, पुस्तके उपलब्ध करुन दिली आहेत. जिल्ह्यात राज्य शासनाच्या पर्यटन विभागाकडून दिनांक २ ते ४ मे २०२५ या कालावधीत महाबळेश्वर येथे होणाऱ्या महापर्यटन महोत्सवामध्ये सातारा जिल्ह्यातील विविध पर्यटन स्थळे, धार्मिक स्थळे याशी संबंधित छायाचित्रांचे प्रदर्शन भरविण्यात आले आहे.

# कंपनीच्या बदनामीची धमकी देऊन खंडणी उकळल्या प्रकरणी एकावर गुन्हा

**फलटण/प्रतिनिधी:**

एका कंपनीच्या बदनामीची धमकी देऊन खंडणीची मागणी करून ती उकळल्या प्रकरणी एका विरोधात फलटण शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मिळालेली माहिती अशी, फलटण येथील के. बी. कंपनी खुटे रोड, सस्तेवाडी येथे आहे. या कंपनीच्या विरोधात सनी घनश्याम काकडे रा. मंगळवार पेठ, फलटण याने एका ग्रुप वर बदनामीकारक मेसेज टाकला. हा मेसेज वाचल्यानंतर कंपनीतील संदीप मोहन शिंदे रा. शिंदेवाडी, ता. फलटण यांनी सनी काकडे ला या बदनामीचे कारण विचारले असता त्याने शिंदे यांच्याकडे दहा लाख रुपये खंडणीची मागणी केली. नाहीतर मी अशाच पद्धतीने कंपनीची बदनामी करेल, अशी धमकी दिली. त्यावेळी सनी काकडे यांची मनधरणी केली असता त्याने ३५००० ची मागणी केली. मागणीनंतर संदीप शिंदे यांनी एटीएम मध्ये जाऊन ३३ हजार रुपये काढून सनी काकडे यांना दिले आणि उर्वरित दोन हजार रुपये दुसऱ्या दिवशी देतो, असे सांगितले. उर्वरित रक्कम नाही मिळाली तर फलटण तालुक्यात तुमची कंपनी चालू देणार नाही व तुमच्या कंपनीच्या सर्व मॅनेजमेंट टीमवर खोटे गुन्हे दाखल करीन. तसेच माझ्याविरुद्ध पोलीस ठाण्यात तक्रार दिली तर तुला ठार मारेन, अशी धमकी काकडे याने शिंदे यांना दिली. त्या अनुषंगाने संदीप मोहन शिंदे यांनी सनी काकडे यांच्याविरोधात फलटण शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

# सुट्टीचा आनंद लुटण्यासाठी पर्यटकांची महाबळेश्वरात गर्दी

**महाबळेश्वर/प्रतिनिधी:-**

१५ ऑगस्टच्या सुट्टीमुळे महाबळेश्वरमध्ये निसर्गाच्या सान्निध्यात पर्यटकांचा ओसंडून वाहणारा उत्साह दिसून येत आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या रिमझिम पावसामुळे आणि दाट धुक्यामुळे येथील निसर्ग अधिकच मनमोहक बनला आहे. हिरवीगार डोंगररांगा, धबधब्यांचे सौंदर्य आणि आल्हाददायक हवा यामुळे मोठ्या संख्येने पर्यटक महाबळेश्वर, पाचगणी आणि आजूबाजूच्या परिसरात दाखल झाले आहेत.

**निसर्गाची हिरवीगार उधळण:**

हलक्या सरींमुळे महाबळेश्वरमधील डोंगररांगांनी पाचूसारखी हिरवी शाल पांघरली आहे. सर्वत्र गच्च हिरवळ आणि धुक्यामुळे येथील वातावरण अधिकच आल्हाददायक झाले आहे. क्षणोक्षणी बदलणाऱ्या या निसर्गाच्या रुपाने पर्यटक मंत्रमुग्ध झाले आहेत.

**प्रेक्षणीय स्थळांवर गर्दी:**

स्वातंत्र्यदिनाच्या सुट्टीत अनेक पर्यटकांनी महाबळेश्वरला पसंती दिली आहे. वेण्णा लेक, ऑर्थर सीट, केट्स पॉईंट, लिंगमळा धबधबा आणि प्रतापगडाच्या पायथ्याशी असलेल्या अनेक निसर्गरम्य ठिकाणी प्रचंड गर्दी उसळली आहे. पर्यटक छत्री आणि रेनकोटचा वापर करत निसर्गाचा मनसोक्त आनंद लुटत आहेत.

**स्थानिक व्यावसायिकांना दिलासा:**

पावसाळी पर्यटन हंगामाला या गर्दीमुळे चांगलीच चालना मिळाली आहे. शहरातील अनेक हॉटेल्स, लॉजेस आणि होमस्टे हाऊसफुल्ल झाले आहेत. यामुळे स्थानिक व्यावसायिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. रस्त्यांवर पर्यटकांची वाढती वर्दळ पाहता काही ठिकाणी वाहतूक कोंडी झाली होती, पण पोलीस प्रशासनाने त्वरित हस्तक्षेप करून ती सुरळीत केली.

**मनसोक्त आस्वाद:**

पर्यटक येथील निसर्गसौंदर्य डोळ्यांत साठवण्यासोबतच गरमागरम चहा, भजी आणि स्थानिक स्ट्रॉबेरी-क्रीमचा आस्वाद घेत आहेत. स्थानिक



विक्रेते, छायाचित्रकार आणि पर्यटनाशी संबंधित इतर व्यवसायांना या गर्दीमुळे मोठा आर्थिक फायदा झाला आहे.

महाबळेश्वरमधील या नयनरम्य वातावरणाने स्वातंत्र्यदिनाचा सोहळा अधिकच संस्मरणीय बनला आहे, असे मत पर्यटक आणि स्थानिकांनी व्यक्त केले.

# भिलार येथे पाळीव कुत्र्यावर बिबट्याचा हल्ला

## शेतकरी,महिला,मुलांमध्ये भीतीचे वातावरण;घटनासी सी टीव्हीत कैद तर भोसेत महिलेला दर्शन

**पांचगणी/प्रतिनिधी:**

भिलार (तालुका महाबळेश्वर ) येथील आंबेडकर नगर वस्तीत काल रात्री बिबट्याने घराच्या दारात बांधलेल्या दोन कुत्र्यावर हल्ला चढवला यात कुत्रा जागेवरच मृत्युमुखी पडला आहे. त्यामुळे भिलार परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. हा बिबट्या व हल्ला सी सी टीव्ही मध्ये कैद झाला आहे. तर भोसे येथेही महिलेला घराबाहेर बिबट्याचे दर्शन झाले आहे..

याबाबत मिळालेली अधिक माहिती अशी की महाबळेश्वर तालुक्यातील भिलार परिसरात गेले वर्षाभरापासून बिबट्याचा वावर वाढला असून यामुळे



भिलार : आज गावात भेट देऊन वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी माहिती घेतली (रविकांत बेलोशे)

गावातील महिला, शेतात काम करणारे शेतकरी व लहान मुलांना भीतीच्या छायेखाली वावरावे लागत आहे. काल रात्री आंबेडकर नगर मधील विठ्ठल कांबळे यांच्या घराच्या कंपाऊंड मधील व्हरांड्यात बांधलेल्या दोन कुत्र्यावर बिबट्याने रात्रीच्या वेळेस हल्ला चढवला. ऐका कुत्र्यावर बिबट्याने झडप घातली दोघांच्यात झटापट झाली परंतु दोघांनिही आरडाओरडा केल्याने बिबट्याने यात पळ काढला परंतु या हलक्या ऐक कुत्रा गंभीर जखमी झाला आहे. काही दिवसापूर्वी याच वस्तीतील अशोक जाधव यांचेही कुत्रे बिबट्याने फस्त केले होते.

याबाबत विठ्ठल कांबळे यांनी वन विभागाशी संपर्क साधला यावरून आज वनक्षेत्रपाल बिरू जावीर, शिपाई संजय भिलारे यांनी भेट दिली असून याची पाहणी केली असता हल्ला करणारा बिबट्याचं असल्याचे सांगितले.

यावेळी वनक्षेत्रपाल बिरू जावीर यांनी गावातील महिला, लहान मुले व नागरिकांनी काळजी घ्यावी. रात्रीच्या वेळी कुणीही घराबाहेर पडू नये. तसेच पाळीव प्राण्यांना घराच्या बाहेर बांधू नये. शेतकऱ्यांनी शेतात जाताना आपली काळजी घ्यावी असे आवाहन केले.

दरम्यान भिलार परिसरात गेले वर्षभरापासून बिबट्याचा वावर वाढला असून गेल्या वर्षी विहिरीत पडलेला बिबट्या वन विभागाने मुक्त केला होता. त्यामुळे सध्या शेतात जाणारा शेतकरी वर्ग चिंतीत झाला आहे. बिबट्याच्या या वावराने नागरिक पुरते भयभीत झाले आहेत. या बिबट्याचा तातडीने बंदोबस्त करावा अशी मागणी ग्रामस्थांमधून होत आहे.

> दरम्यान भोसे गावात ही आज रात्री सुमन चंद्रकांत गोळे यांना बिबट्याचे दर्शन घडले आहे. रात्री दीड वाजण्याच्या सुमारास घराबाहेरील कुत्र्यांचा आवाज आल्याने आपल्या घरच्या खिडकीतून सुमन गोळे यांनी खिडकीतून बॅटरीचा उजेडाने बाहेर पाहिले यावेळी त्यांना या बिबट्याचे दर्शन झाले व त्या घाबरल्या. वन विभागाने भोसे गावातही जनजागृती करून सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

# सांगलीत भटक्या मोकाट कुत्र्यांचा हैदोस

## बंदोबस्त करण्याची सचिनभाऊ कदम फौंडेशनची मागणी

**सांगली/प्रतिनिधी:**

सांगली, मिरज व कुपवाड महापालिका हद्दीत सध्या मोकाट कुत्र्यांनी हैदोस घातला आहे. चौका-चौकात या मोकाट कुत्र्यांनी अनेकांचे लचके तोडले आहेत. या घटना ताज्या असतानाच सांगलीतील क्रांती क्लिनिकजवळील सीताराम नगरमध्ये कुत्र्याच्या टोळक्याने तेथीलच एका जनावरावर हल्ला करून त्याचे प्राण घेतले. त्यानंतर या कुत्र्यांनी त्याचे लचके तोडत परिसरात हैदोसा घातला.

गेल्या काही दिवसापासून महापालिका क्षेत्रात विशेषतः सांगली व मिरज शहरात भटक्या कुत्र्यांनी उच्छाद मांडला आहे. जागोजागी या कुत्र्यांची टोळके थांबून लहान मुले, महिला व वृद्धावर हल्ले करीत आहेत.



यामध्ये अनेक जण जखमी झाल्याच्या घटना ताज्या असतानाच सांगलीतील क्रांती क्लिनिक जवळील सीताराम नगरमध्ये काही कुत्र्यांच्या कळपाने एका जनावरावर हल्ला करून त्याला ठार मारले व काही क्षणामध्ये त्याचे लचके तोडले. हे विदारक दृश्य पाहून अनेकांचे मन हेलावून गेले या मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करणार आहे की नाही असा संतप्त सवाल नागरिकांमधून व्यक्त होत आहे. या मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी सांगलवाडी येथील सामाजिक कार्यकर्ते सचिन भाऊ कदम फाउंडेशनने केली आहे. त्याबाबतचा एक व्हिडिओ चांगलाच व्हायरल होत आहे. या घटनेची गांभीर्याने दखल घेऊन या मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी व्यक्त होत आहे तसेच नागरिकांनी आवाज उठविण्यासाठी एकत्र येण्याची गरज आहे.

# स्वातंत्र्यदिनी कराडमध्ये विजय स्तंभास मानवंदना

**कराड/प्रतिनिधी : -**

७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त विजय दिवस समारोह समितीतर्फे येथील विजय स्तंभावर पुष्पचक्र अर्पण करून शहीद जवानांना मानवंदना देण्यात आली. कराड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी प्रशांत व्हटकर यांच्या शुभहस्ते हा कार्यक्रम पार पडला.

शहीद जवानांना आदरांजली वाहिल्यानंतर भारत माता की जय, झाडे लावा झाडे जगवा, वंदे मातरम्, छत्रपती शिवाजी महाराज की जय अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. याप्रसंगी श्री. व्हटकर यांनी स्वातंत्र्य दिनाचे मनोगत व्यक्त करून सर्वांना शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमास समितीचे उपाध्यक्ष अरुण जाधव, संचालक विनायक विभुते, सहसचिव विलासराव



जाधव, प्राचार्य गणपतराव कणसे, प्रा. बी. एस. खोत, प्रा. रजनिश पिसे, प्रा. महालिंग मुढेंकर, शिंदे सर, जयदीप अरबुने, माजी नगर अभियंता ए. आर. पवार, प्रा. जालिंदर काशीद, रजिस्ट्रार सालवाडगी सर, संतोष पवार, दैनिक सकाळचे उपसंपादक हेमंत पवार, पत्रकार, वृत्तवाहिन्यांचे प्रतिनिधी, माजी सैनिक अधिकारी, सामाजिक संस्थांचे पदाधिकारी, एनसीसी कॅडेट्स, विद्यार्थी, नगरपरिषद कर्मचारी व ट्रॅफिक पोलीस यांच्यासह मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आण्णाभाऊ साठेंचा पुतळा उभारणीसाठी आठ दिवसात प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे सादर करा

## ना.अजितदादा पवार

**इस्लामपूर/प्रतिनिधी:**

उरुण-ईश्वरपुर शहरात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा उभारणीसाठी आवश्यक असणारी जागा उपलब्द करुन देणे संदर्भात सांगली जिल्ह्याचे जिल्हाधिकारी अशोक काकडे व उरुण-ईश्वरपुर नगरपरीषदेचे मुख्याधिकारी पृथ्वीराज पाटील यांना महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांनी आठ दिवसात आवश्यक त्या शिफारशी सह प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे सादर करा असा आदेश दिला, राज्यशासनाकडुन त्यास मंजुरी देण्याची माझी जबाबदारी असल्याचे सांगितले.

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार हे सांगली जिल्ह्याच्या दौर्यावर आले असता ईश्वरपुर येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा उभारणीसाठी जागा उपलब्द व्हावी यासाठी उपोषण सुरु आहे, उपोषणस्थळी भेट देऊन त्यांनी उपोषणकर्ते, जिल्हाधिकारी अशोक काकडे, जिल्हा पोलीस प्रमुख संदीप घुगे, उरुण-ईश्वरपुर नगरपरीषदेच मुख्याधिकारी पृथ्वीराज पाटील यांच्या शी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी चर्चा केली.

यावेळी मुख्याधिकारी पृथ्वीराज पाटील यांना जागा मंजुरी चा ठराव तात्काळ करुन जिल्हाधिकारी सांगली यांच्याकडे पाठवुन देणेबाबत आदेश दिला व जिल्हाधिकारी अशोक काकडे यांना आवश्यक त्या शिफारशीसह सदरचा प्रस्ताव राज्यशासनाकडे आठ दिवसात पाठविणेबाबत आदेश दिला, राज्यशासनाकडे प्रस्ताव आला की मी तो मंजुर करुन घेतो ती माझी जबाबदारी असेल असा शब्द उपोषणकर्तांना उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांनी



दिला.यानंतर उपोषणकर्तांनी व उपस्थितांनी एकच जयघोष केला.

यावेळी सांगली जिल्हा राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे अध्यक्ष निशिकांत भोसले-पाटील (दादा),माजी उपनगराध्यक्ष जयवंत पाटील,संजय कोरे, केदार पाटील, दत्तात्रय पाटील पुतळा समितीचे चे अध्यक्ष शंकरराव महापुरे, डॉ, विजय चांदणे नंदकुमार नांगरे, डॉ. सुधाकर वायदंडे, संदीप वायदंडे,विकास बल्लाळ, पुतळा महोत्सव समितीचे अध्यक्ष उत्तम चांदणे संतोष चांदणे, बापूराव बडेकर, सदाभाऊ चांदणे, रमेश सकटे, विनोद बल्लाळ, रामभाऊ देवकुळे, लालासाहेब तांबे संदीप तडाखे, भास्कर चव्हाण, लालासाहेब चव्हाण, प्रदीप चव्हाण, तानाजी साठे, उत्तम चांदणे, लालासाहेब बल्लाळ आदिसह अन्य मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.